बुलडाणा जिल्हा परिषदेमधील विविध संवर्गाची रिक्त पदे (गट क व गट ड) भरणे साठीची जाहीरात

जाहीरात क्रमांक : २ / २०१४

उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे दिनांक १२ ऑगष्ट २०१४ चे पत्रानुसार, जिल्हा परिषदेतील गट क व गट ड च्या सरळसेवेच्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया दिनांक १७.१२.२००९ च्या शासन पत्रात दिलेल्या वेळापत्रकानुसान, सन २०१४ च्या नोव्हेंबर महिन्यात राबविण्यांत यावी असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेकडील गट क व गट ड मधील विविध संवर्गातील रिक्त पदे शासन निर्णय दिनांक ३ जुन २०१४ व ५ जुन २०१४ मधील व शासन निर्णय दिनांक २४.७.२०१४ मधील आरक्षणाच्या तरतुदी नुसार खालील प्रमाणे भरावयाची आहेत. अर्हता धारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच जिल्हा परिषदेच्या www.zpbuldhana.maharashtra.gov.in व www.buldhana.nic.in या संकेत स्थळामार्फत पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यांत येत आहे.

**** गट क व गट ड पदांकरिता ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी ****

ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात	ऑन लाईन अर्ज भरण्यांची अंतीम मुदत
दिनांक २७.८.२०१४ सकाळी १०.०० वाजेपासुन	**दिनांक ११.९.२०१४ दुपारी २.०० वाजेपर्यंत**

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात जिल्हा परिषदेच्या www.zpbuldhana.maharashtra.gov.in व www.buldhana.nic.in या संकेत स्थळामार्फत उपलब्ध असुन उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजुन घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता केवळ उपरोक्त नमुद संकेत स्थळावरुन विहीत ऑनलाईन पध्दतीने केलेलेच अर्ज व विहीत चलनाव्दारे परिक्षा शुल्क स्विकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यांत येणार नाहीत. जिल्हा परिषदेच्या तसेच www.zpbuldhana.maharashtra.gov.in व www.buldhana.nic.in या संकेत स्थळामार्फत भरती प्रक्रिया कालावधी दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

भरती प्रक्रिया / परिक्षा / स्थगीत करणे किंवा रद्द करणे/अशंत: बदल करणे/पदाच्या एकूण संवर्ग निहाय संख्येमधे वाढ किंवा घट/शुध्दिपत्रक प्रसिध्द करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत निर्णय अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती बुलडाणा हे स्वत: कडे राखून ठेवत आहेत. तसेच गट ड चे भरती बाबत सर्व अधिकार अध्यक्ष जिल्हा परिषद निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा हे स्वत:कडे राखून ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

*** सरळसेवा भरतीने, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार भरावयाची रिक्त पदे, खालील प्रमाणे आहेत ***

अ क	सामाजिक प्रवर्ग	रिक्त पदांची संख्या	समांतर आरक्षणाची पदे							
			माजी सैनिक/ पाल्य १५ %	महिला ३० %	अंशकालीन कर्मचारी (पदविधर) १०%	प्रकल्पग्रस्त ५%	खेळाडू ५%	अपंग ३%	सर्वसाधारण	एकूण
वित्त विभाग - वरिष्ठ सहाय्यक (लेखा) (वर्ग ३) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २४००										
१	अ.जा.	१	-	-	-	-	-	-	१	१
२	खुला	१	-	१	-	-	-	-	-	१
एकूण		**२**	**-**	**१**	**-**	**-**	**-**	**-**	**१**	**२**
वित्त विभाग - कनिष्ठ सहायक (लेखा) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे १९००										
१	अ.जाती	१	-	-	-	-	-	-	१	१
एकुण		**१**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**१**	**१**
औषध निर्माण अधिकारी - औषध निर्माण अधिकारी वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन २८००										
१	अ.जा.	१	-	-	-	-	-	-	१	१
२	अ.जमाती	१	-	-	-	-	-	-	१	१
३	वि.जा.अ.	१	-	-	-	-	-	-	१	१
एकुण		**३**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**३**	**३**
आरोग्य सेवक (महीला) वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००										
१	अ.जा.	५	१	-	१	-	-	१ अंध/ क्षिणदृष्टी, १ कर्णबधीर	३	५
२	अ.ज.	२	-	-	-	-	-		२	२
३	विजाअ	१	-	-	-	-	-		१	१
४	इ.मा.व.	११	२	-	१	१	१		६	११
५	इएसबीसी	७	१	-	१	-	-		५	७
६	विमाप्र-अ	२	-	-	-	-	-		२	२
७	खुला	३५	५	-	४	२	२		२२	३५
एकुण		**६३**	**९**	**-**	**७**	**३**	**३**		**४१**	**६३**

टिप:- गणवत्तेनुसार निवड झालेला अपंग उमेदवार ज्या सामाजिक आरक्षणातील असेल त्याच प्रवर्गातील सर्वसाधारण जागेवर त्यांना सामावुन घेण्यात येईल व त्या प्रवर्गाचे सर्वसाधारण उमेदवारांमधुन भरावयाचे पद कमी होईल.

अ क	सामाजिक प्रवर्ग	रिक्त पदांची संख्या	समांतर आरक्षणाची पदे							
			माजी सैनिक/ पाल्य १५ %	महिला ३० %	अंशकालीन कर्मचारी (पदविधर) १०%	प्रकल्पग्रस्त ५%	खेळाडू ५%	अपंग ३%	सर्वसाधारण	एकूण
आरोग्य सेवक पुरुष (५०%) हंगामी फवारणी कर्मचा-यांमधुन वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रे.वे. २४००										
१	अ.जा	२	-	-	-	-	-	१ अंध/ क्षिणदृष्टी, कर्णबधीर	२	२
२	भ.ज.ब.	१	-	-	-	-	-		१	१
३	भ.ज.क.	२	-	-	-	-	-		२	२
४	इ.मा.व.	५	१	-	-	-	-		४	५
५	इएसबीसी	२	-	-	-	-	-		२	२
६	विमाप्र-अ	१	-	-	-	-	-		१	१
७	खुला	१३	२	-	१	१	१		८	१३
एकुण		**२६**	**३**	**-**	**१**	**१**	**१**		**२०**	**२६**
आरोग्य सेवक पुरुष (४०%) सरळसेवा वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रे.वे.२४००										
१	अ.ज.	५	१	-	-	-	-	१ अंध/ क्षिणदृष्टी, कर्णबधीर	४	५
२	भ.ज.ब.	१	-	-	-	-	-		१	१
३	भ.ज.क.	३	-	-	-	-	-		३	३
४	इएसबीसी	३	-	-	-	-	-		३	३
५	विमाप्र-अ	१	-	-	-	-	-		१	१
६	खुला	१७	३	-	२	१	१		१०	१७
एकुण		**३०**	**४**	**-**	**२**	**१**	**१**		**२२**	**३०**
टिपः- निवड झालेला अपंग उमेदवार ज्या सामाजिक आरक्षणातील असेल त्याच प्रवर्गातील सर्वसाधारण जागेवर त्यांना सामावुन घेण्यात येईल व त्या प्रवर्गाचे सर्वसाधारण उमेदवारांमधुन भरावयाचे पद कमी होईल.										
कंत्राटी ग्रामसेवक (एकत्रीत मानधन दरमहा रु.६०००/-) (कायम प्रवास भत्ता रु.११००/-)										
१	अ.जा.	२	+१	-	-	-	-	-	१	२
२	अ.जमाती	२	+१	-	-	-	-	-	१	२
३	भजक	१	-	-	-	-	-	-	१	१
४	इएसबीसी	१	-	-	-	-	-	-	१	१
५	खुला	६	१	२	१	-	-	-	२	६
एकुण		**१२**	**३**	**२**	**१**	**-**	**-**	**-**	**६**	**१२**
टिप :- मागील जाहीरातीचे वेळी कंत्राटी ग्रामसेवक या पदाकरीता समांतर आरक्षणांतर्गत माजी सैनिक उमेदवार मिळाला नसल्याने या वर्षीचे पदभरती करीता मागील भरती प्रक्रियेचे वेळी माजी सैनिकांसाठी रिक्त असलेली पदे (+ या चिन्हासमोरील संख्या) पुनच्छ दर्शविण्यात आली आहेत.										
पर्यवेक्षिका (महीला) सरळसेवा वेतन श्रेणी - ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४१००										
१	भ.ज.क.	१	-	-	-	-	-	-	१	१
२	इ.मा.व.	१	-	-	-	-	-	-	१	१
३	इएसबीसी	१	-	-	-	-	-	-	१	१
४	खुला	७	१	-	१	-	-	-	५	७
एकुण		**१०**	**१**	**-**	**१**	**-**	**-**	**-**	**८**	**१०**
पर्यवेक्षिका (महीला) (अंगणवाडी सेविकांमधुन स्पर्धा परिक्षेद्वारे निवडीने) -९३००-३४८०० ग्रेड वेतन ४१००										
१	अ.जमाती	२	-	-	-	-	-	-	२	२
२	भज (ब)	१	-	-	-	-	-	-	१	१
३	भज (क)	१	-	-	-	-	-	-	१	१
४	भज (ड)	१	-	-	-	-	-	-	१	१
५	इ.मा.व.	३	-	-	-	-	-	-	३	३
६	खुला	३	-	-	-	-	-	-	३	३
एकुण		**११**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**११**	**११**
टिप :- सदर पदे पदोन्नतीचे कोटयातील असुन जिल्हा परिषद बुलडाणा अधिनस्त ग्रामीण प्रकल्पातील अंगणवाडी संविकांमधुन भरावयाची आहेत त्यामुळे इतर जिल्हयातील अंगणवाडी सेविका यांनी अर्ज करु नये.										
कनिष्ठ अभियंता (ग्रापापु) वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३००										
१	अ.जमाती	२	-	१	-	-	-	-	१	२
२	विजाअ	१	-	-	-	-	-	-	१	१
३	भजब	१	-	-	-	-	-	-	१	१
४	विमाप्र	१	-	-	-	-	-	-	१	१
५	खुला	१	-	-	-	-	-	-	१	१
एकुण		**६**	**-**	**१**	**-**	**-**	**-**	**-**	**५**	**६**

अ क	सामाजिक प्रवर्ग	रिक्त पदांची संख्या	समांतर आरक्षणाची पदे							
			माजी सैनिक/ पाल्य १५ %	महिला ३० %	अंशकालीन कर्मचारी (पदविधर) १०%	प्रकल्पग्रस्त ५%	खेळाडू ५%	अपंग ३%	सर्वसाधारण	एकूण
कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (सिंचन विभाग) वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३००										
१	अ.जमाती	१	-	-	-	-	-	-	१	१
२	विजाअ	१	-	-	-	-	-	-	१	१
३	इमाव	२	-	१	-	-	-	-	१	२
४	इएसबीसी	१	-	-	-	-	-	-	१	१
५	खुला	४	१	१	-	-	-	-	२	४
	एकुण	**९**	**१**	**२**	**-**	**-**	**-**	**-**	**६**	**९**
स्थापत्य अभियांत्रीकी सहायक (सिंचन विभाग) वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००										
१	अ.जा.	१	-	-	-	-	-	-	१	१
२	अ.ज.	१	-	-	-	-	-	-	१	१
३	खुला	२	-	१	-	-	-	-	१	२
	एकुण	**४**	**-**	**१**	**-**	**-**	**-**	**-**	**३**	**४**
विस्तार अधिकारी कृषी वेतन श्रेणी ९३००-३४८०० गेड वेतन ४२००										
१	अ.ज.	१	-	-	-	-	-	-	१	१
२	खुला	१	-	-	-	-	-	-	१	१
	एकुण	**२**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**२**	**२**
उच्च श्रेणी लघुलेखक वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४००										
१	खुला	१	-	-	-	-	-	-	१	१
	एकुण	**१**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**१**	**१**
निम्न श्रेणी लघुलेखक वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३००										
१	अ.जा.	१	-	-	-	-	-	-	१	१
	एकुण	**१**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**१**	**१**
लघु टंकलेखक वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००										
१	खुला	१	-	-	-	-	-	-	१	१
	एकुण	**१**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**१**	**१**
वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) (वर्ग ३) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २४००										
१	अ.जमाती	२	-	-	-	-	-	-	२	२
	एकुण	**२**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**२**	**२**
कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) (वर्ग ३) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे १९००										
१	अ.जमाती	२	-	-	-	-	-	-	२	२
२	भ.ज.ब	२	-	-	-	-	-	-	२	२
३	भ ज क	२	-	१	-	-	-	-	१	२
४	वि मा प्र	१	-	-	-	-	-	-	१	१
	एकूण	**७**	**-**	**१**	**-**	**-**	**-**	**-**	**६**	**७**
परिचर वर्ग ४ वेतनश्रेणी वेतनश्रेणी ४४००-७४४० ग्रेड पे १३००										
१	अ. जा.	१	-	-	-	-	-	-	१	१
२	अ.ज.	५	१+१	१	१	-	-	-	१	५
४	भ.ज.ब.	२	-	१	-	-	-	-	१	२
५	भ.ज.क.	१	-	-	-	-	-	-	१	१
६	भ.ज.ड.	१	-	-	-	-	-	-	१	१
	एकुण	**१०**	**२**	**२**	**१**	**-**	**-**	**-**	**५**	**१०**
टिप :- मागील जाहीरातीचे वेळी परिचर (वर्ग-४) या पदाकरीता समांतर आरक्षणांतर्गत माजी सैनिक उमेदवार मिळाला नसल्याने या वर्षीचे पदभरती करीता मागील भरती प्रक्रियेचे वेळी माजी सैनिकांसाठी रिक्त असलेली पदे (+ या चिन्हासमोरील संख्या) पुनच्छ दर्शविण्यात आली आहेत.										
शिक्षण विस्तार अधिकारी श्रेणी-२,वर्ग-३ वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४००										
१	इ.मा.व	१	-	-	-	-	-	-	१	१
२	खुला	३	-	-	-	-	-	-	३	३
	एकुण	**४**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**-**	**४**	**४**
पशुधन पर्यवेक्षक वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००										
१	अ.जमाती	२	-	१	-	-	-	-	१	२
	एकुण	**२**	**-**	**१**	**-**	**-**	**-**	**-**	**१**	**२**

अ क्र	सामाजिक प्रवर्ग	रिक्त पदांची संख्या	समांतर आरक्षणाची पदे							
			माजी सैनिक/ पाल्य १५ %	महिला ३० %	अंशकालीन कर्मचारी (पदविधर) १०%	प्रकल्पग्रस्त ५%	खेळाडू ५%	अपंग ३%	सर्वसाधारण	एकूण
कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम विभाग) वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३००										
१	अ.जा.	१	-	-	-	-	-	-	१	१
२	अ.जमाती	२	-	१	-	-	-	-	१	२
३	भजड	१	-	-	-	-	-	-	१	१
४	विमाप्र	१	-	-	-	-	-	-	१	१
एकुण		**५**	**-**	**१**	**-**	**-**	**-**	**-**	**४**	**५**
स्थापत्य अभियांत्रीकी सहायक (बांधकाम विभाग) वेतन श्रेणी ५२००-२०२०० गेड वेतन २४००										
१	अ.जा.	४	१	१	-	-	-	१ अंध/ क्षिणदृष्टी, कर्णबधीर	२	४
२	अ.जमाती	१	-	-	-	-	-		१	१
३	विजाअ	१	-	-	-	-	-		१	१
४	भजक	१	-	-	-	-	-		१	१
५	विमाप्र	१	-	-	-	-	-		१	१
६	इमाव	४	१+१	१	-	-	-		१	४
७	इएसबीसी	३	-	१	-	-	-		२	३
८	विमाप्र-अ	१	-	-	-	-	-		१	१
९	खुला	१४	२	४	१	१	१		५	१४
एकुण		**३०**	**५**	**७**	**१**	**१**	**१**		**१५**	**३०**

टिप:- १) निवड झालेला अपंग उमेदवार ज्या सामाजिक आरक्षणातील असेल त्याच प्रवर्गातील सर्वसाधारण जागेवर त्यांना सामावुन घेण्यात येईल व त्या प्रवर्गाचे सर्वसाधारण उमेदवारांमधुन भरावयाचे पद कमी होईल.

२) मागील जाहीरातीचे वेळी स्था.अ.स. या पदाकरीता समांतर आरक्षणांतर्गत माजी सैनिक उमेदवार मिळाला नसल्याने या वर्षीचे पदभरती करीता मागील भरती प्रक्रियेचे वेळी माजी सैनिकांसाठी रिक्त असलेली पदे (+ या चिन्हासमोरील संख्या) पुनच्छ दर्शविण्यात आली आहेत.

रिक्त पदांचा तपशिल, शैक्षणिक अर्हता व अनुभव :- खाली नमुद केलेली शैक्षणिक अर्हता जाहीरात संकेत स्थळारावर प्रसिध्द करण्याच्या दिनांकापर्यंत प्रमाणपत्रासहीत पूर्णधारण करणे आवश्यक आहेत.

अ.क्र	पदाचे नांव	आवश्यक शैक्षणिक अर्हता
१	वरिष्ठ सहायक (लेखा)	मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी धारण करीत असतील या बाबतीत लेखा शास्त्र व लेखा परिक्षा हे विशेष विषय घेवुन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा पहिल्या किंवा दुस-या वर्गातील पदवी धारण करणा-या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षाहुन कमी नसेल इतक्या अखंड कालावधीपर्यत लेखा विषयक कामाचा पदवीनंतर प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल.
२	कनिष्ठ सहायक(लेखा)	माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण आणि महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचा-यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परिक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकीय परिक्षा विभाग शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी मराठी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील.
३	औषध निर्माण अधिकारी	माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व डिप्लोमा इन फार्मसी उत्तीर्ण,औषध निर्माण शास्त्र अधिनियम १९४८ अन्वये नोंदणीकृत.
४	आरोग्य सेवक (महीला)	माध्यमीक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व सहायक परिचारीका प्रसाविकेचा १८ महीन्याचा नर्सिंग कोर्स उत्तीर्ण,महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा नोंदणसाठी जे पात्र असतील. ***(सदर पद केवळ महीलांकरीता आहे.)***
५	आरोग्य सेवक पुरुष (५०%) हंगामी फवारणी कर्मचा-यांमधुन	विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व हंगामी फवारणी कर्मचारी म्हणुन ९० दिवसापेक्षा जास्त दिवस काम केल्याचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र व जिल्हा कोषागारातुन वेतन आहारीत केल्याबाबतचे प्रमाणपत्र.
६	आरोग्य सेवक पुरुष (४०%)	विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण
७	कंत्राटी ग्रामसेवक	१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण आणि कृषी पदविका दोन वर्षाच्या अभ्यासक्रम धारण केलेला असावा किंवा कृषी विषयक पदवी किंवा तत्संबंधी उच्च अर्हता धारण करणारे तसेच B tech AGRO Engineering पदविधारक किंवा २) उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६० टक्के गुणासह उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रीकी पदविका (तिन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासन मान्य संस्थेची समाज कल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यु.) ३) संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेली परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराने अर्ज सादर करते वेळी सोबत सादर करणे अनिवार्य राहील.(माध्यमीक शालांत परिक्षा उत्तीर्ण आणि कृषी पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम धारण केलेल्या किंवा कृषी विषयक पदवी किंवा तत्संबंधी उच्च अर्हता धारण करणा-या तसेच B tech AGRO

		Engineering पदविधारक ही शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारास संगणक हाताळणी वापराबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बाबतची अट परिक्षेचा अर्ज भरते वेळी बंधनकारक नाही.उमेदवार सेवेत आल्यानंतर दोन वर्षाच्या आत संगणक हाताळणी/वापराबाबत माहीती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेली परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराने सादर करणे बंधनकारक राहील) **टिपः- उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६० टक्के गुणासह उत्तीर्ण उमेदवार यांचे कडे अर्ज करते वेळी संगणक अर्हता असणे आवश्यक आहे.**
८	पर्यवेक्षीका (महिला)	कला, विज्ञान, वाणिज्य, कृषि विधी, समाज कार्य, समाजशास्त्र ग्रृहविज्ञान पोषण आहार किंवा त्यास समतुल्य म्हणून शासनाने घोषीत केलेली कोणतीही पदवी अर्हता धारण केलेली असावी मान्यता प्राप्त विद्यापिठाची समाज कार्य किंवा शिक्षण या विषयातील स्नातक पदवीधारण करीत असलेल्या उमेदवारांना अग्रक्रम दिला जाईल. ***(सदर पद केवळ महीलांकरीता आहे.)***
९	पर्यवेक्षिका (महीला) (अंगणवाडी सेविकेमधुन स्पर्धा परिक्षेद्वारे निवडीने)	अंगणवाडी सेविका या पदावर ज्यांची १० वर्ष मानधनी सेवा पुर्ण झालेली आहे. व माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण आहे. अशा अंगणवाडी सेविका मधुन भरावयाची आहे. (अनुभव अंगणवाडी सेविका, बालवाडी सेविका, शासन मान्य व शासन अनुदानीत असावा इतर बालवाडी (खाजगी) अनुभव विचारात घेतले जाणार नाही.) ***(सदर पद केवळ महीलांकरीता आहे.)*** • सदर पदे पदोन्नतीच्या कोटयातील असून जिल्हा परिषद बुलडाणा अधिनस्त ग्रामिण प्रकल्पातील अंगणवाडी सेविकांमधुन भरावयाची आहेत. त्यामुळे इतर जिल्हयातील अंगणवाडी सेविका यांनी अर्ज करु नये.
१०	कनिष्ठ अभियंता (ग्रापापु) कनिष्ठ अभियंता (सिंचन) कनिष्ठ अभियंता (बांधकाम)	स्थापत्य अभियांत्रीकी या विषयातील मान्यता प्राप्त पदवी किंवा पदवीका (तीन वर्षाचा) पाठयक्रम किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल. संगणक हाताळणी/वापराबाबत माहीती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराने अर्ज करते वेळी सादर करणे अनिवार्य राहील.
११	स्थापत्य अभियांत्रीकी सहायक (सिंचन) स्थापत्य अभियांत्रीकी सहायक (बांध.)	शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणा-या किमान स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यकाची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण असावी किंवा पुढील पैकी समकक्ष पाठयक्रम (१) आर्क्रीटेक्चरल ड्राफसमन (वास्तुशास्त्रीय आरेखक) (२) कंन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक, (३) आरेखक (स्थापत्य) हा दोन वर्षाचा पाटयक्रम, (४) नॅशनल कॉन्सिल ऑफ ट्रेनिंग फॉर व्होकेशनल ट्रेडस (एनसीटीव्हीटी) / नॅशनल ॲपरेंटीस सर्टीफिकेट (एनएसी) द्वारा सैनिक सेवेतील कंन्स्ट्रैक्शन सुपरवायझर पदावरील या शाखेतील अनुभवाच्या आधारे देण्यात येणारे प्रमाणपत्र (शासनाकडून प्राप्त स्पष्टीकरणानुसार स्थापत्य अभियांत्रीकी संबधातील उच्चअर्हता प्राप्त पदवीका पदवीधारक देखील या पदासाठी अर्ज करु शकतात.) संगणक हाताळणी/वापराबाबत माहीती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराने अर्ज करते वेळी सादर करणे अनिवार्य राहील.
१२	विस्तार अधिकारी कृषी	सांविधिक विद्यापिठाची कृषी विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता तथापी ज्यांनी कृषी कामाची उच्च शैक्षणिक अर्हता व कृषी कामाचा अनुभव प्राप्त केला असेल किंवा सुधारीत कृषी ग्रामीण जिवनाचा प्रत्यक्ष अनुभव असणा-यांना प्राधान्य देण्यात येईल.
१३	उच्च श्रेणी लघुलेखक	माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) या अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने शिक्षणाच्या माध्यमिक टप्याच्या अखेरीस घेतलेली शाळा प्रमाणपत्र परिक्षा त्या परिक्षेस तुल्य असलेली परिक्षा उत्तीर्ण झालेले असतील आणि आयुक्त शासकीय परिक्षा विभागीय शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिलेले किंवा त्या नियमाच्या प्रयोजनार्थ शासनाकडून विनिर्देश पुर्वक मान्यता देण्यात आलेल्या अन्य कोणत्याही संस्थेने दिलेले इंग्रजी किंवा मराठी लघुलेखकनातील दर मिनिटास १२० शब्दाहून कमी नसेल इतक्या गतीचे आणि इंग्रजी टंकलेखनातील दरमिनिटास ४० शब्दाहुन किंवा मराठी टंकलेखनातील दर मिनिटास ३० शब्दाहुन कमी नसेल इतक्या गतीचे प्रमाणपत्र धारण करीत असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल.
१४	निम्न श्रेणी लघुलेखक	माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) याअन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने शिक्षणाच्या माध्यमिक टप्याच्या अखेरीस घेतलेली शाळा प्रमाणपत्र परिक्षा त्या परिक्षेस तुल्य असलेली परिक्षा उत्तीर्ण झालेले असतील आणि आयुक्त शासकीय परिक्षा विभागीय शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिलेले किंवा त्या नियमाच्या प्रयोजनार्थ शासनाकडून विनिर्देश पुर्वक मान्यता देण्यात आलेल्या अशा इतर संसथेने इंग्रजी किंवा मराठी लघुलेखनातील दर मिनिटाला १०० शब्दाहून कमी नसेल इतक्या गतीचे प्रमाणपत्र जे धारण करीत असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल.
१५	लघु टंकलेखक	माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तीच्याशी समतुल्य परिक्षा जे उत्तीर्ण झाले असतील असे उमेदवार आयुक्त शासकीय केंद्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिलेले किंवा या नियमाच्या प्रयोजनार्थ शासनाकडून विनिर्देशपुर्वक मान्यता देण्यात येईल अशा अन्य संस्थेने दिलेले इंग्रजी किंवा मराठी लघुलेखनातील दर मिनिटास ८० शब्दापेक्षा कमी नसेल व इंग्रजी टंकलेखनातील दर मिनिटास ४० शब्दापेक्षा कमी नसेल किंवा मराठी टंकलेखनातील दर मिनिटास ३० शब्दा पेक्षा कमी नसेल इतक्या वेगाचे प्रमाणपत्र ज्यांच्याक्डे असेल असे उमेदवार

१६	वरिष्ठ सहायक (लिपीक)	संविधिमान्य विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल.
१७	कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय)	माध्यमीक शालांत प्रमाणपत्र अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि टंकलेखन परिक्षा (महाराष्ट्र कमर्शियल सर्टीफिकेट मराठी ३० श.प्र.मी.व इंग्रजी ३० श.प्र.मी.या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील असे उमेदवार.
१८	परिचर	मान्यता प्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता चौथी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे
१९	शिक्षण विस्तार अधिकारी (श्रेणी-२) वर्ग -३	मान्यता प्राप्त विद्यापिठाचे स्नातक असतील आणि बी.एड.पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) घेतल्यानुतरच्या प्राथमीक किंवा माध्यमिक शाळेतील अगर कनिष्ठ महाविद्यालयातील कमीत कमी तिन वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल किंवा बि.एड.पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्या नंतरचा प्राथमीक किंवा माध्यमीक शाळा तपासण्याचा कमीत कमी तिन वर्षाचा अनुभव असेल किंवा माध्यमीक शाळा प्रमाणपत्र परिक्षा पास झाल्यानंतरचा पाच वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आणि शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले असेल अशा उमेदवारांमधुन नेमणुक करण्यात येईल.
२०	पशुधन पर्यवेक्षक	माध्यमिक शाळा प्रमाणपत्र उत्तीर्ण झाल्यानंतर पशुसंवर्धन संचालनालयाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानीक कृषी विद्यापिठाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापिठाने चालविलेला पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्याच्या तंत्रशिक्षण परिक्षा मंडळा मार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषी विद्यापिठामार्फत चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापिठाने चालविलेला दोन वर्षाचा दुग्ध व्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील असे उमेदवार किंवा वैधानिक विद्यापिठामधील पशुवैद्यकिय शास्त्रातील पदविधारण करीत असतील असे उमेदवार.

वयोमर्यादा :-

०१. उपरोक्त पदाकरिता जाहिरातीच्या प्रसिध्दी दिनांकापर्यंत वयोमर्यादा गणली जाईल.

०२. उपरोक्त पदाकरीता **<u>जाहिरातीच्या दिनांकास</u>** उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

०३. मागासवर्गीय उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. परंतु उन्नत व प्रगत गटांमधे क्रिमीलेयर (Creamylayer) मोडणाऱ्या वि.आ.-अ, भ.ज.ब, भ.ज.क., भ.ज.ड विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांना ही सवलत लागू नाही.

०४. पर्यवेक्षिका महीला (अंगणवाडी सेविकेमधुन स्पर्धा परिक्षेद्वारे (निवडीने)) या पदासाठी उमेदवाराचे वय ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

०५. दिनांक १७ ऑगष्ट २०१३ च्या शासन परिपत्रकानुसार नॉन क्रिमीलेयर वैध प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच अंतिम निवडीपुर्वी मुळ प्रमाणपत्र पडताळणीसाठी मागणी केल्यास सादर करणे बंधनकारक राहील.

**** कमाल मर्यादा पुढील प्रकरणी शिथिलक्षम असेल.****

०१. शारिरीक दृष्टया अपंग उमेदवारांच्या बाबतीत वयाचे ४५ वर्षापर्यंत.

०२. संरक्षण दलात ६ महिन्यापेक्षा जास्त सलग सेवा केलेल्या माजी सैनिकांकरीता, संरक्षण दलातील सेवा अधिक ३ वर्ष तथापी अपंग माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत.

०३. सक्षम प्राधिकाऱ्याच्या दाखल्यानुसार (अ) स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशत पाल्य (ब) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व (क) सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी या उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.

०४. सुशिक्षित बेराजगारांना अर्थ सहाय्यक या योजने अंतर्गत शासकिय कार्यालयामधे तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदविधारक अंशकालीन उमेदवारांना शासकिय गट क पदावरील सरळसेवेने त्यांना सध्याच्या ४५ वर्ष वयोमर्यादेत आणखी एक वर्षाने वाढ करुन सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यांत येईल.

०५. खेळाडुंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथीलक्षम.

०६. महाराष्ट्र जिल्हा परिषद (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील ३ (फ) नुसार जिल्हा परिषद सेवेतील कार्यरत कर्मचाऱ्यांस अर्ज करणेसाठी वयोमर्यादा कमाल ४५ अशी राहील.

**** विशेष सुचना ****

०१. परिचर गट ड चे पद वगळून गट क च्या पदांकरिता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण २०००/ प्रक्र ६१ / २००१ / ३९ दिनांक १९.०३.२००३ अन्वये अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संगणक हाताळणे / वापराबाबतचे खालील नमुने प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दोन वर्षांचे आंत असणे आवश्यक राहील **(ज्या पदाकरीता अर्ज करते वेळी संगणक हाताळणी अर्हता आवश्यक आहे ती पदे वगळुन)** अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

०२.(अ) D O E A C C सोसायटीच्या अधिकृत C C C किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा GECT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र (क) मराठी, हिंदी भाषेसह परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. **(ज्या पदाकरीता अर्ज करते वेळी संगणक हाताळणी अर्हता आवश्यक आहे ती पदे वगळुन)**

०३. सदर भरतीचे नियम / निकषांमधे भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसुचना / निर्णय / परिपत्रक / पत्रानुसार बदल होऊ शकतो.

**** परिक्षेचे स्वरुप ****

०१. लेखी परिक्षे मधुन निवडीस पात्र होण्यासाठी किमान गुण :

शासन परिपत्रक क्रमांक एपीटी २००७४ / प्रक्र ३०३ (अ) / आस्था ८ दिनांक १९.०३.२००८ सोबतचे परिशिष्ट ब नुसार तसेच ग्राम विकास विभाग शासन निर्णय दिनांक ०५ जून, २०१४ व शासन परिपत्रक दिनांक ५ जुलै २०१४ नुसार लेखी

परिक्षा गुणांकनाचे स्वरुप खालील प्रमाणे राहील-

अ.क्र	पदनाम	लेखी परिक्षेचे गुण
१	कनिष्ठ अभियंता	२००
२	स्थापत्य अभियांत्रीकी सहायक	२००
३	विस्तार अधिकारी कृषी	२००
४	पर्यवेक्षिका (महिला) (सरळसेवा)	२००
५	पर्यवेक्षिका (महीला) (अंगणवाडी सेविकेमधुन (निवडीने))	२००
६	शिक्षण विस्तार अधिकारी	२००
७	औषध निर्माण अधिकारी	२००
८	वरिष्ठ सहायक (लेखा)	२००
९	आरोग्य सेवक (पुरुष)	२००
१०	आरोग्य सेवक (महीला)	२००
११	कंत्राटी ग्रामसेवक	२००
१२	पशुधन पर्यवेक्षक	२००
१३	वरिष्ठ सहायक (लिपीक)	२००
१४	कनिष्ठ सहायक (लिपीक)	२००
१५	कनिष्ठ सहायक (लेखा)	२००
१६	उच्च श्रेणी लघुलेखक	२००
१७	निम्न श्रेणी लघुलेखक	२००
१८	लघु टंकलेखक	२००
१९	परिचर (वर्ग-४)	१००

टिप :- लेखी परिक्षेतील गुणानुक्रमे निवड केली जाईल वरिल पदाकरीता शासन निर्णय दिनांक ५.६.२०१४ अन्वये मुलाखत राहणार नाही.

<u>लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रीकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे</u>

१. परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ट, बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

२. ज्या पदाकरीता कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परिक्षा आहे अशा पदांकरिता परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला शासन परिपत्रक दि.५ जूलै २०१४ मध्ये नमुद प्रमाणे विषयांवर प्रश्न राहतील.

३. ज्या पदाकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदाकरीता परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहतील. परंतु मराठी संबंधित प्रश्नाचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील व लेखी परिक्षेला शासन परिपत्रक दि.५ जूलै २०१४ मध्ये नमुद प्रमाणे विषयांवर प्रश्न राहतील.

४. जिल्हास्तरीय पदांसाठी निवड होणा-या उमेदवारांना बुलडाणा जिल्हयाचा भुगोल, समाजिक इतिहास, हवामान इत्यादी स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.

५. परिचर (गट ड) पदांबाबत प्रश्न पत्रिकेचा दर्जा इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परिक्षेस समकक्ष राहील.

६. लेखी व तोंडी (लागू पदांना) परिक्षेमधे उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतीम निवड साठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील अन्यथा अंतीम निवडसाठी विचार केला जाणार नाही. मौखिक / व्यावसायिक परीक्षेसाठी उमेदवार गैरहजर राहिल्यास उमेदवारांची निवड करण्यांत येणार नाही.

७. ज्या पदासाठी मुलाखत घेण्यांत येणार नाही त्या पदांवर लेखी परिक्षमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार निवडीनंतर उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतीम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

***** परिक्षेचा दिनांक व वेळ खालील प्रमाणे *****

अ.क्र	पदाचे नांव	दिनांक	वार	वेळ
०१	कनिष्ठ अभियंता	२.११.२०१४	रविवार	सकाळी १० ते ११.३०
०२	विस्तार अधिकारी कृषी	२.११.२०१४	रविवार	सकाळी १० ते ११.३०
०३	पर्यवेक्षिका (महीला) (सरळसेवा)	२.११.२०१४	रविवार	दुपारी २ ते ३.३०
०४	पर्यवेक्षिका (महीला) (अंगणवाडी सेविकेमधुन (निवडीने))	२.११.२०१४	रविवार	दुपारी २ ते ३.३०
०५	विस्तार अधिकारी (शिक्षण)	२.११.२०१४	रविवार	दुपारी २ ते ३.३०
०६	औषध निर्माता	८.११.२०१४	शनिवार	सकाळी १० ते ११.३०
०७	वरिष्ठ सहायक (लेखा)	८.११.२०१४	शनिवार	सकाळी १० ते ११.३०
०८	आरोग्य सेवक (पुरुष)	८.११.२०१४	शनिवार	दुपारी २ ते ३.३०
०९	आरोग्य सेवक (महीला)	८.११.२०१४	शनिवार	दुपारी २ ते ३.३०
१०	कंत्राटी ग्रामसेवक	९.११.२०१४	रविवार	सकाळी १० ते ११.३०
११	स्थापत्य अभियांत्रीकी सहायक	९.११.२०१४	रविवार	दुपारी २ ते ३.३०
१२	पशुधन पर्यवेक्षक	१६.११.२०१४	रविवार	सकाळी १० ते ११.३०
१३	वरिष्ठ सहायक (लिपीक)	१६.११.२०१४	रविवार	सकाळी १० ते ११.३०
१४	कनिष्ठ सहायक (लिपीक)	१६.११.२०१४	रविवार	दुपारी २ ते ३.३०
१५	कनिष्ठ सहायक (लेखा)	१६.११.२०१४	रविवार	दुपारी २ ते ३.३०
१६	उच्च श्रेणी लघु लेखक	२२.११.२०१४	शनिवार	सकाळी १० ते ११.३०
१७	निम्न श्रेणी लघु लेखक			
१८	लघु टंकलेखक			
१९	परिचर	२२.११.२०१४	शनिवार	दुपारी २ ते ३.३०

लेखी परिक्षे्करिता प्रवेशपत्र, तसेच इतर विविध सुचना या केवळ **www.zpbuldhana.maharashtra.gov.in** व **www.buldhana.nic.in** या संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यांत येतील, पोष्टाव्दारे पाठविण्यांत येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमा बाबत अद्यावत राहण्याची प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती :-

०१. लेखी परिक्षेच्या अंतीम जाहिराती नुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्र पडताळणी करण्याकरीता अंतरीम निवड यादी जाहिर करण्यांत येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परीक्षा शुल्क, मूळ कागदपत्राच्या आधारे परीपूर्ण सिध्द होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यांत येईल. जाहिरातीतील नमुद केलेली संपूर्ण अहर्ता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची निवड भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशा उमेदवारांचे मागितलेले सामाजिक किंवा समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परिक्षा शुल्क इत्यादी सारख्या सवलती नामंजुर करण्यांत येतील याची कृपया नोंद घ्यावी.

**** नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी ****

०१. **www.zpbuldhana.maharashtra.gov.in** व **www.buldhana.nic.in** या अधिकृत संकेत स्थळामार्फत ऑनलाईन अर्ज भरावा.

०२. शासन निर्णय साप्रवि क्रमांक प्रशिक्षण २०००/प्रक्र ६१ / २००१/ ३९, दिनांक १९.०३.२००३ अन्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संगणक हाताळणे / वापराबाबतचे नमुद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन वर्षांत प्राप्त करणे आवश्यक राहील. **(ज्या पदाकरीता अर्ज करते वेळी संगणक हाताळणी अर्हता आवश्यक आहे ती पदे वगळुन)**

०३. विभागीय भाषा परिक्षा : विहीत शासकीय नियमानुसार विभागीय भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

०४. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

०५. सेवा प्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

०६. निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरीता शारिरीक पात्रतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

०७. नियुक्तीपूर्वी मुळ शैक्षणिक कागदपत्रे इत्यादींची छाननी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. छाननी अंती मुळ प्रमाणपत्रांमध्ये त्रृटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्द होईल.

०८. माजी सैनिकांच्या बाबतीत सैन्यात भरती झाला त्यावेळेचे वय अधिक त्यांची सैन्यातील सेवा अधिक तीन वर्ष या पेक्षा जास्त नसावी. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केले बाबतचे आवश्यक कागदपत्रे / जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र व सेवा तपशिल दर्शविणारे सेवा अभिलेख आवश्यक तसेच स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य सदर पदासाठी माजी सैनिक या समांतर आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही.

०९. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (मागासवर्गीयासाठी आरक्षण अधिनियम २००४ मधील कलम ४ (३) नुसार विमुक्त जाती (अ) भटक्या जामतील (ब) भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांसाठी विहीत केलेले आरक्षण परिवर्तनिय असेल.

१०. महिलांचे आरक्षणबाबतच्या तरतुदी शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक ८२ / २००१ / म से अ / २००० / प्रक्र ४१५ / का दिनांक २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहील. दिनांक ३१ मार्च २०१३ अखेरचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११. सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडील शासन परिपत्रक दिनांक २५.१.२००५ मधील परिच्छेद क्रमांक ४ व ७ मधे नमुद केले नुसार स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित व्यक्ती, संपकालीन कर्मचारी १९८१ व १९९१ चे जनगणना कर्मचारी आणि अंशकालीन पदविधर बेरोजगार यापैकी उमेदवार गुणवत्ता यादीमध्ये जर एका पेक्षा जास्त उमेदवार एकाच क्रमांकावर असतील तर वरिल परिच्छेदात नमुद पसंतीक्रमाच्या प्राधान्यानुसार वर नमुद संवर्गातील उमेदवारांना प्राधान्य क्रमाने उमेदवारांची निवड करण्यांत येईल.

**** ऑन लाईन अर्ज करण्याची पध्दत ****

०१. प्रस्तुत पदांकरिता फक्त **www.zpbuldhana.maharashtra.gov.in** व **www.buldhana.nic.in** या अधिकृत संकेत स्थळामार्फत विहीत पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यांत येणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/ अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिष्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिया दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वाहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना जिल्हा निवड समिती बुलडाणा जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल. उमेदवारांनी स्वत:चा फोटो व स्वाक्षरी स्क्रॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे.

०२. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.zpbuldhana.maharashtra.gov.in या संकेत स्थळामार्फत वर नमुद कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

ऑन लाईन अर्ज भरण्याची सुरुवात दिनांक व वेळ	ऑन लाईन अर्ज भरण्याची अंतीम दिनांक व वेळ
दिनांक २७.८.२०१४ सकाळी १०.०० वाजेपासुन	दिनांक ११.९.२०१४ दुपारी २.०० वाजेपर्यंत

***** विशेष सुचना *****

१. पात्र व अपात्र उमेदवारांची अंतरीम यादी व अंतिम पात्र व सुधारीत अंतिम यादी प्रसिध्द करण्यांत येईल. यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट ध्यावी.

२. उर्वरित कालावधीत उमेदवारांना संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र उपलब्ध करुन घेता येईल.

३ उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने स्वीकारण्यांत येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामधे उमेदवाराने त्यांचे पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातील नमुद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा, शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासुनच ऑनलाईन अर्ज करावा.

४ उमेदवाराची लेखी परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडी बाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यांत येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांची ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल पडताळणी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यांत येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याची संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती, बुलडाणा यांचे जवळ राखुन ठेवण्यांत आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

५ ऑन लाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना **www.zpbuldhana.maharashtra.gov.in** व **www.buldhana.nic.in** या संकेतस्थळामार्फत उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर **स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत** फी भरण्याचे चलन ३ प्रतिमधे (उमेदवारांची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समिती बुलडाणा प्रत) उपलब्ध होईल. सदर चालनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराला चलनात नमुद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमधे पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरता येईल. सदरच्या ३ प्रतिपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व जिल्हा

निवड समिती बुलडाणा प्रत स्टेट बँक इंडिया या बँकेकडून परत मिळेल. त्यापैकी जिल्हा निवड समिती, बुलडाणा प्रत उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी जिल्हा निवड समिती, बुलडाणा यांचेकडे जमा करावी. सदर चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवारांची कागदपत्रे छाननी / मुलाखत घेतली जाणार नाही. बँकेत परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी वर नमुद केल्यानुसार राहील. या दिनांकानंतर बँकेत परिक्षा शुल्क स्विकारला जाणार नाही.

६ **उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या** कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती **www.zpbuldhana.maharashtra.gov.in** व **www.buldhana.nic.in** या संकेतस्थळामार्फत पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वतःचा चालू ई मेल आय डी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवारांना ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई मेल आयडी व्दारे होणार असल्याने अचुक ई मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच स्वतःच्या अद्यावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन www.zpbuldhana.maharashtra.gov.in व www.buldhana.nic.in या संकेतस्थळामार्फत सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

७ ऑन लाईन अर्ज स्विकारण्याची अंतीम तारिख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.कोणत्याही सबबीवर पुन्हा सुरु केली जाणार नाही.

८ ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहीत परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/ वेळापत्रक / परिक्षा केंद्र / बैठक इत्यादि बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यांत येईल. या संबंधि स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

९ अपंग संवर्गातील उमेदवाराकडे किमान अंपगत्वाचे प्रमाण ४० टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र असावे. शासन परिपत्रक सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क्र.२ दिनांक १८ मार्च २०१४ अन्वये अपंग उमेदवारास लेखी परिक्षेकरीता लेखनिकाची आवश्यकता असल्यास नियुक्ती प्राधिकारी यांचे कडुन लेखनिकाची व्यवस्था केली जाईल अथवा १८ मार्च २०१४ च्या शासन निर्णयामध्ये नमुद नियमाप्रमाणे उमेदवाराची इच्छा असल्यास ते स्वत : लेखनिकाची व्यवस्था करु शकतील.याबाबत उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरते वेळी यंत्रणेकडुन लेखनिक घेणार आहे किंवा उमेदवार स्वत : लेखनिकाची व्यवस्था करणार आहे याचा अर्जात सुस्पष्ट उल्लेख करणे आवश्यक राहील तसेच उक्त नमुद शासन परिपत्रकातील अटी व शर्थी अपंग उमेदवारास बंधनकारक राहतील.

१० ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालया / समाज कल्याण आदीवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदलेली आहेत अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदासाठीच्या लेखी परीक्षेसाठी स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवार स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही तसेच अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

११ शासन निर्णय शालेय व क्रिडा विभाग क्र राक्रिधा २००२/प्रक्र ६८/क्रियुसे-२/दिनांक ३०.४.२००५ व शालेय व क्रिडा विभाग क्र राक्रिधा २००२ / प्रक्र ६८ / क्रियुसे - २ /दिनांक १८.११.२००६ मधील तरतुदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडुसाठी असलेले आरक्षण त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ६ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवंर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडुसाठी असलेले आरक्षण हे समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडु प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील खेळांचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे असावे. खेळांडुच्या आरक्षित पदावर नेमणुकीकरिता ज्या उमेदवारांची शिफारस होईल त्यांचे प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील तपासणी अहवालानंतरच त्यांना नेमणुक देण्यांत येईल.

१२ अंशकालीन उमेदवारांनी, त्यांनी सुशिक्षीत बेराजगार अर्थसहाय्य या योजने अंतर्गत तीन वर्ष दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर / पदविधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१३ माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नांव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१४ भुकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र मागणी केल्यावर सादर करणे आवश्यक आहे.

१५ महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / निरधिसुचीत जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज.(क),

भ.ज.(ड), विशेष मागासवर्ग यांना लागु आहे या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याने वैध (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१६ शासन निर्णय महिला व बाल कल्याण क्रमांक ८२/२००१ म.से.आ २००० / प्रक्र ४१५ का २ दिनांक २५.०५.२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष २०१३-२०१४ या कालावधी करिता वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे.

१७ विहीत वयोमर्यादेतील शासकिय / निमशासकिय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने मुदतीत अधिकृत संकेतस्थळवरुन ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करावी.

१८ सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्रमांक एसआरव्ही २००० / प्रक्र १७ /२०००/१२ दिनांक २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही २०००/प्रक्र १७ /२०००/१२ दिनांक १ जुलै २००५ नुसार विहीत केल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ, ब, क व ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणुन विहीत नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१९ अनुभवाच्या बाबतीत मासिक नियतकालीक, अंशकालीन, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन, तत्वावर केलेला अंशकालीक सेवा कालावधी तसेच प्रभारी म्हणुन नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

२० ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस / कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यांवर अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल व त्याच्या विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यांत येईल.

२१ शासन निर्णय क्रमांक बीसीसी / २०११ / प्रक्र १०६४/२०११ दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे अशा उमेदवारांना आदेशाच्या दिनांकापासुन ०६ महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील.

२२ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभुल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यांत येईल.

२३ वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो /१०/०५/१२६/ सेवा ४ दिनांक ३१/१०/२००५ नुसार दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागू राहील. त्यांना सध्या अस्वित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे म.ना.से (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से. (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहणार नाही.

२४ अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

२५ परिक्षेस / कागदपत्र पडताळणी / व्यावसायीक चाचणी / बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२६ जिल्हा परिषद गट क व गट ड पदांची एकत्रीत जाहीरात असल्याने काही पदांबाबत शैक्षणिक/तांत्रीक/व्यावसायीक पात्रतेमध्ये भिन्नता असु शकते केवळ सर्व समावेशक एकत्रीत वरील सुचना असल्याने तसेच शब्द रचनेतील अर्थाबाबत दावा करता येणार नाही.

***** परिक्षा शुल्क *****

खालील प्रमाणे शुल्क भरावे लागले.

खुला प्रवर्ग रुपये २९०/- **मागास प्रवर्ग रुपये १९०/-**

माजी सैनिकांना परीक्षा शुल्क माफ आहे. (माजी सैनिकांना परिक्षा फी माफ असली तरी चलॉन अपडेट करण्याकरीता ०००००० असे दर्शवुन चलॉन अपडेट करुन फॉर्म सबमिट करावा.त्याशिवाय ऑनलाईन फॉर्म स्विकारल्या जाणार नाही.)

(वर दर्शविण्यांत आलेले परीक्षा शुल्क बॅंक प्रोसेसिंग चार्जेस वगळूनआहेत)

उक्त परीक्षा शुल्क स्टेट बॅंक ऑफ इंडिया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाद्वारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

टिप :- स्टेट बँक ऑफ इंडिया कडुन रुपये ५०/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल.सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे. रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

ऑन लाईन अर्ज स्विकारण्याचा दिनांक	ऑन लाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक	चलनाद्वारे शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	चलॉन अपडेट करण्याचा अंतिम दिनांक
दिनांक २७.८.२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजेपासुन	**दिनांक ११.९.२०१४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत**	**दिनांक १३.९.२०१४ बँक स्विकारेपर्यंत**	**दिनांक १४.९.२०१४ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत**

विशेष सुचना

०१. या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही, तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरिता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.

०२. अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी **८३७८९३३३१०** या (हेल्पलाईनवर) सकाळी १०.०० ते ५.३० या वेळात भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
कार्यकारी अभियंता (बांध)
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
कार्यकारी अभियंता (ग्रापापु)
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
कार्यकारी अभियंता (सिंचन)
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
मुख्य लेखा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सचिव जि.नि.स.तथा
कृषी विकास अधिकारी
जिल्हा परिषद बुलडाणा

स्वा/-
सदस्य जिल्हा निवड समीती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बुलडाण

स्वा/-
अध्यक्ष,जिल्हा निवड समीती तथा
जिल्हाधिकारी बुलडाणा